**नोट** दिनांक २०/०७/२०२२

| | |
|---|---|
| पोलीस ठाणे | खंडणी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई. |
| गु.र.क्र. व कलम | गु.प्र.शा., गु.र.क्र. ९५/२०२२ कलम ३८७ भा.द.वि. (ओशिवरा पोलीस ठाणे, गु.र.क्र. ११४०/२०२२) |
| गुन्हा घडला दिनांक, वेळ | दि.०९/०७/२०२२ रोजी २३:५७ वा. ते दि. ११/०७/२०२२ रोजी १५:२४ वा. पर्यंत |
| आरोपी अटक | एक इसम |
| अटक दिनांक | दिनांक १९/०७/२०२२ |
| हस्तगत मुद्देमाल | दोन मोबाईल, दोन सिमकार्ड |

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत :-** दिनांक ०९/०७/२०२२ रोजी रात्री ११.५७ वा. फिर्यादी हे अंधेरी (पूर्व) या ठिकाणी असताना अनोळखी इसमाने फिर्यादीस परराज्यातील मोबाईल क्रमांकावरून फोन करून ''मे शकील भाई का आदमी बिल्लो बात कर रहा हू । टयुसडे तक मुझे ३५ लाख चाहिये । मे डी कंपनीसे बात कर रहा हू । छोटा शकील नाम नही सुना है क्या । टयुसडे तक ३५ लाख नही मिला तो तुझे उडा दुगा । पुरा मुंबई हम लोग चलाते है ''।

त्यानंतर देखील नमूद इसमाने फिर्यादीस छोटा शकील च्या नावाने धमकावले. म्हणून नमूद अनोळखी मोबाईल वरून फिर्यादीस कॉल करण्याऱ्या बिल्लो नाव सांगणाऱ्या इसमाविरुध्द वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

त्यानंतर देखील नमूद इसमाने दि. १३/०७/२०२२ ते दि. १९/०७/२०२२ पर्यंत विविध परराज्यातील मोबाईल क्रमांकांचा वापर करून फिर्यादीस फोन करून धमकाविले आहे.

नमूद गुन्हयाचा तपास करत असताना गोपनीय माहितीच्या आधारे नमूद गुन्हयातील आरोपीस कॉल आलेल्या दिनांकापासून अहोरात्र सापळा रचून दि. १९/०७/२०२२ रोजी ओशिवरा परिसरातून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. सदर अटक इसमास मा. न्यायालयाने दि. २५/०७/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदरची कामगिरी मा. सह पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. सुहास वारके, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. बाळसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील व.पो.नि. ज्ञानेश्वर गणोरे, पो.नि. अरुण थोरात, स.पो. नि. मारुती कदम, पो.उ.नि. जालिंद्र लेंभे, पो.ह. संतोष सुर्वे, संदीप ब्रीद, दिलीप लोखंडे, विजय थोरात, पो.ना. निलेश कंद, रोहन सुर्वे, अमोल तोडकर, म.पो.ना. साधना थोरात, पो.शि. रणपिसे यांनी पार पाडलेली आहे.

Scanned with CamScanner